I J R S S I S, Vol. VII, Issue (1), January 2019 : 01- 06 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# महिला उद्योजकता

प्रा. डॉ. वनिता य. वंजारी

गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख श्री शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा,जि. चंद्रपूर

सारांशः

उद्योजकता म्हणजे अंगीकृत करणे, स्विकारणे होय. उद्योजकता ही सृजनात्मक किया आहे. कोणत्याही व्यवसायाचे संचालन करतांना , सामान्‍यपणे ज्या गोष्टी केल्या जात नाही अशा गोष्टीवेगळया पध्दतीने करण्याच्या किया उद्योजकते मध्ये समाविष्ट होतात. उद्योजकते मध्ये मुख्य निर्मीती करण्याचा प्रयत्न करणे , जोखीम स्विकारण्याच्या कियेचे व्यवस्थापन व मानवी, भौतीक संसाधनांची गरज या गोष्टांचा समावेश होतो. मानवी जीवनाची व व्यवस्थेची सर्व क्षेत्रे आणि मनुष्याचे सर्व व्यवहार उद्योजकतेच्या परिघामध्ये अंर्तभूत आहेत.

आजच्या जागातीकरणाच्या काळात या क्षेत्रात महिलांनी देखील पदार्पन केलेले आहे.महिलांमध्ये काही गुण वैशिष्टे आहेत जी उद्योगाला उपयुक्त ठरणारी अशी आहेत. जसे चिकाटी, मेहनत करण्याची तयारी, यश संपादन करण्याची जिद्य, संघटन कौशल्य परिस्थितीस सामोरे जाण्याची तयारी इत्यादी.

सामाजीक वातावरण जेवढे अनुकुल व पोषक होईल तेवढयाच प्रमाणात महिलांची उद्योगशिलता वाढीस लागेल.

**प्रस्तावना :**

उद्योजकता ही एक अर्थशास्त्रीय संकलपना आहे. त्याची उत्पत्ती 16 व्या शतकामध्ये फान्स मध्से झाली. उद्याजकता ही संकल्पना काळानुसार, परिस्थितीनुसार आणि बदलत्या परिस्थितीनुसार आणि बदलत्या संदर्भानुसार बदलत गेली.

उद्योजकता हे गुतवणूक आणि उत्पादनाची संधी शोधण्याचे, उत्पादनाची नवीन प्रकिया सुरू करण्याच्या दृष्टीने उपकमाला संघटीत करण्याचे, भांडवल उभारणी करण्याचे, कामगारांना कामावर लावण्याचे, कच्च्या मालाचा पुरवठा करण्याची व्यवस्था करण्याचे, उपकमाकरिता जागा शोधण्याचे, नवीन तंत्र व वस्तुंची ओळख करून देण्याचे, कच्च्या मालाचे नवीन स्त्रोत शोधण्याचे आणि उपकमाचे दैनंदिन व्यवहार चालविण्याकरिता वरिष्ठ व्यवस्थापकाची निवड करण्याचे कार्य आहे.

उद्योजकता ही एक सृजनात्मक किया आहे. कोणत्याही व्यवसायाचे संचालन करतांना सामान्यपने ज्या गोष्टी केल्या जात नाही अशा गोष्टी वेगळया पध्दतीन करण्याच्या किया उद्योजकतेमध्ये समाविष्ट होतात. उद्योजकता म्हणजे नवनिर्मीत उद्योजकाला केलेल्या नवनिर्मीतीमुळे मुलभूत बदल घडून येतात. या बदलामुळे अर्थकारणातील स्थितीशिलता संपुष्ठात येऊन चैतन्य निर्मान होते. उत्पादनाची साधने उत्पादन कार्यामध्ये गुंतविली जातात व परिणामतः आर्थिक विकासाला चालना मिळते.

उद्याजकतेचा संबंध तीन गोष्टींशी जोडण्यात आला.

1. व्यावसायीक संधीचा शोध घेऊन त्या माध्यमातून मुख्य निर्मिती करण्याचा प्रयत्न म्हणजे उद्योजकता होय.
2. उद्योजकतेमध्ये जोखीम स्विकारण्याच्या कियेचे व्यवस्थापन समानिष्ट आहे.
3. एखादा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी मानवी, आर्थिक आणि भौतिक संसाधने आवश्यक असतात.

राष्ट्रीय व्यवस्थेचे प्रत्येक क्षेत्रामध्ये नवीन उपकमाची स्थापना करण्याच्या व या उपकमांचा कारभार सुरळीत पणे चालवून नवनवीन आव्हाने यशस्वीपणे स्विकारण्याच्या प्रकियेत उद्योजकाची भूमीका फार महत्वाची असते. ही भूमीका प्रभावीपणे पार पाडण्यासाठी उद्योजकाला अनेक जबाबदा–या पार पाडाव्या लागतात. या जबाबदा–या स्वीकारून पार पाडण्यासाठी उद्योजकामध्ये विशिष्ट मानसिकता असायला हवी.

उद्योजकतेचा संबंध विशिष्ट व्यक्ती किंवा व्यक्तिसमुह त्या व्यक्तीचे कार्य किंवा उद्यिष्ट प्राप्तीसाठी तिला करावी लागणारी भूमीका, हे कार्य सिध्द करण्यासाठी उभारली जाणारी

उपकमाची संघटना आणि जेथे हे कार्य केले आहे तेथे असलेले पर्यावरण अशा चार गोष्टींशी येतो.

व्यक्ती संघटन उद्योजकता कार्य पर्यावरण

जागतीकीकरणाच्या काळात महिलांनी विविध क्षेत्रात पदार्पण कलेले दिसत आहे. उद्योजकतेच्या क्षेत्रात अलीकडील दशकात संख्या खूप वाढलेली आहे. स्त्रियांनी सद्यपरिस्थितीत प्रगतीची दालने स्वतःच्या प्रयत्नाने प्राप्त करून घेतली आहे. तरी देखील याचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत बरेच कमी आढळते. याला अनेक कारणे आहेत. पुरूष प्रधान संस्कृतीमुळे स्त्रिया पुरूषांच्या अधिकाराखाली वावरतांना दिसतात. कुटुंबाचा सांभाळ करण्याची प्रमुख जबाबदारी स्त्रियांवर असल्याने गृहकार्यामध्ये त्यांचा खूप वेळ खर्च होतो.तसेच स्त्री /महिला या नात्याने अनेक सामाजीक बंधने त्यांना पाळावी लागतात. आर्थिक पातळीवर जोखीम पत्करण्याची क्षमता परिस्थितीमुळेस्त्रियांमध्ये कमी प्रमाणात असते. अशा अनेक कारणांनी महिला उद्योजकतेच्या क्षेत्रात कमी प्रमाणात सहभागी होताना आढळतात.तरी देखील अभ्यासाअंती असे आढळून आले की, महिलांमध्ये उद्योजकोय क्षमता असते. त्यांच्यातील काही गुण वैशिष्टे उद्योगास उपयुक्त ठरणारी आहेत असे दिसून आले. जसे चिकाटी, मेहणत करण्याची तयारी, यश संपादण करण्याची जिद्य, संघटन कौशल्य, परिस्थितीस सामोरे जाण्याची तयारी इत्यादी.

महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उद्योजकतेमध्ये पाऊल पाऊल टाकण्याकरिता वेगवेळया संस्था व शासनही प्रयत्नशील आहे.

उद्योगाास सहाय्य करणा–या संस्था

1. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ.
2. भारतीय औद्योगीक वित महामंडळ.
3. खादी ग्रामोद्योग मंडळ.
4. महाराष्ट्र राज्य औद्योगीक विकास महामडंळ.
5. म्हाराष्ट्र औद्योगीक व तांत्रिक मार्गदर्शन संघटना.
6. जिल्हा उद्योग केंद्र.
7. व्यापारी बॅका.
8. भारतीय लघुउद्योग विकास बॅक

याशिवाय भारत सरकार व विविध वित्तीय संस्थानी महिला उद्योजकांसाठी वित्तसहाय्य करण्याच्या दृष्टीने विशेष योजना जाहीर केलेल्या आहे.

1. महिला उघम योजना.
2. बीज भांडवल योजना.
3. नॅशनल इक्विटो फंड योजना.
4. पंतप्रधान रोजगार योजना.
5. एक खिडकी योजना.
6. जिल्हा उद्योग केंद्र योजना.
7. व्याज अनुदान योजना.
8. स्त्री शक्ती योजना.
9. खादी ग्रामोद्योगाच्या योजना.
10. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना.

अशा प्रकारे महिला उद्योजकतेकरीता अनेक योजना राबविल्या जातात. त्याचा लाभ महिला उद्योजक घेऊ शकतात.

संदर्भः

1. देशमुख प्रभाकर –उद्योजकता विकास
2. वैरागडे/मुळे –आधुनीक गृहव्यवस्थापन
3. देशमुख प्रभाकर –व्यावसायीक उद्योजकता
4. महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, वार्षिक अहवाल

❖❖❖❖